# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ८३ शनिवार दि.०४ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## दीक्षाभूमीतून महाबोधी महाविहार मुक्तीचा संकल्प; भंते विनाचार्यकडून देशव्यापी आंदोलनाचे.

नागपूर : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी ऐतिहासिक धम्मक्रांती करत देशात बौद्ध धम्म पुनर्स्थापित केला, आता त्यांचे लाखो अनुयायी बौद्धांसाठी पवित्र असलेल्या महाबोधी महाविहार मुक्त करतील आणि बाबासाहेबांचा सन्मान वाढवतील असा संदेश देत मुक्ती आंदोलनाचे प्रणेते भंते विनाचार्य यांनी नागपूरच्या दीक्षाभूमीवर आयोजित धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्याच्या मंचावरून देशव्यापी आंदोलनाचे आवाहन केले.





६९ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित मुख्य सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून भंते विनाचार्य बोलत होते. मंचावर सारनाथ येथील भदंत चंद्रिमा थेरो, चंदीगढ येथील आयएएस अधिकारी राजशेखर वृंदू यांच्यासह दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई उपस्थित होते.

यावेळी उपस्थित जनसमूहाला संबोधित करताना भंते विनाचार्य म्हणाले,' धम्मक्रांती केल्यावर बाबासाहेबांनी भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न बघितले होते. मात्र भगवान बुद्धांना ज्ञानप्राप्ती झालेले महत्वाचे ठिकाण बौद्धांच्या हातात नसल्यामुळे बौद्ध धम्माच्या प्रचार–प्रसाराला गती मिळाली नाही. त्यामुळे बोधगया महाविहार मुक्त करणे बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीला गतीमान करण्यासाठी गरजेचे आहे.'

**दीक्षाभूमीने देशाचे नेतृत्व कराव**

'बाबासाहेबांनी धम्मदीक्षा दिल्यावर मागील ६९ वर्षात झालेल्या परिवर्तनाचे मूल्यांकन करण्यासाठी स्मारक समितीने विशेष अधिवेशनासाठी पुढाकार घ्यावा आणि हे मूल्यांकन झाल्यावर देशातील बौद्धांचे नेतृत्व या पवित्र दीक्षाभूमीतून व्हावे. आम्ही सर्व सोबत चालायला तयार आहोत, अशा भावना भदंत चंद्रिमा थेरो यांनी व्यक्त केल्या. राजशेखर यांनी सांगितले की बाबासाहेबांची रक्तविहीन धम्मक्रांती सामाजिक विषमतेच्या विरोधातील लढा होता. बाबासाहेबांनी मानवाचा मानवाशी असलेला संबंध प्रतिपादित करत सामाजिक बदलाकडे घेऊन जाणारी तार्किक चळवळ सुरू केली, असेही ते म्हणाले.

**लाखोंचा भीमसागर उसळला**

दीक्षाभूमीवर गुरुवारी लाखोंचा भीमसागर उसळला. दीक्षाभूमी मध्यवर्ती स्तुपात बाबासाहेब आंबेडकर आणि भगवान बुद्ध यांना अभिवादन करण्यासाठी दिवसभर लांबच लांब रांगा बघायला मिळाल्या. यात कर्नाटक,तेलंगाना, तमिळनाडू या दक्षिण भारतातील राज्यांसह बिहार, गुजरात या राज्यांमधूनही मोठ्या संख्येत अनुयायी उपस्थित होते. दीक्षाभूमीवर सकाळी ९ वाजता भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई आणि भिक्खु संघाच्या उपस्थित सामूहिक बुद्ध वंदना आणि बावीस प्रतिज्ञांचे वाचन झाले. सायंकाळी मुख्य सोहळ्यानंतर संविधान या महानाट्याचे सादरीकरण करण्यात आले. दरम्यान, उच्च न्यायालयाने फटकारल्यावर स्थानिक प्रशासनाने अनुयायांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी पुरजोर प्रयत्न केले आणि त्यात बऱ्याच प्रमाणात यशही मिळविले, स्वयंसेवी संस्थाकडूनही अनुयायांसाठी विविध उपक्रम राबविण्यात आले.

## ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन नेरूळ ज्वेल ऑफ नवी मुंबई येथे उत्साहात साजरा..!



नवी मुंबई / के. एच. हनवते :– अशोक विजयादशमी या पावन दिवशी ज्वेल ऑफ नवी मुंबई लॉर्ड बुद्धा पार्क येथे तथागत भगवान गौतम बुद्ध स्मारकासमोर ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन अशोक विजयादशमी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इ.स. १९५६ साली लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेऊन सामाजिक क्रांतीचा पाया रचला. त्यांच्या प्रेरणेतून समाज प्रबोधनाची दिशा लाभली. या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बेलापूर विधानसभा विद्यमान आमदार : सौ मंदाताई म्हात्रे, यांनी पुष्पांजली अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वंदन केले. सदर कार्यक्रमात सर्वप्रथम विधिवत बुद्ध वंदना बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते यांनी घेऊन कार्यक्रमाची सुरुवात केली, या कार्यक्रमास उपस्थित समाजसेवक : महेश खरे यांनी सो. मंदाताई म्हात्रे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तर या कार्यक्रमास समाजसेवक : विजय साळे यांच्या वतीने खीरदान वाटप करण्यात आले. लॉर्ड बुद्धा पार्क येथील कार्यक्रमास विविध स्तरातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नागरिक तसेच धम्मबांधवांनी या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे स्मरण करताना आपण सर्वांनी समानता, बंधुता व प्रगतीच्या वाटेवर चालण्याचा संकल्प करुया असा निश्चय केला. सरते शेवटी धम्मपालन आणि सरणतय गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली



## शिक्षणाची जिद्द व धम्माची कास धरा जिल्हा प्रबंधक अनिल बनसोडे

लातूर :– पूर्वाश्रमीच्या महार समाजाचा व आजच्या बौद्धांचा जो विकास झाला तो केवळ बाबासाहेबांच्या धम्मक्रांतीमुळे व वाईट चालीरीतीला ठोकर मारल्यामुळे झाला या धम्मक्रांतीने समाजाला जगण्याचे एक नवे आत्मभान मिळाले. शिक्षणासाठी गरिबी अडचण ठरत नाही फक्त शिक्षणासाठी जिद्द असावी लागते म्हणून आजच्या तरुण पिढीने शिक्षणाची जिद्द मनामध्ये बाळगून धम्माची व शिक्षणाची कास धरावी व व्यसनापासून दूर राहावे असे प्रतिपादन दूरसंचार विभागाचे जिल्हा प्रबंधक इंजिनिअर अनिल बनसोडे यांनी केले. ते बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त वैशाली सार्वजनिक बुद्ध विहार बौद्ध नगर लातूर येथे तथागत भगवान बुद्ध व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्प व पुष्प माला अर्पण करून करण्यात आले. याप्रसंगी व्हीएस पँथरचे अध्यक्ष विनोद खटके माजी नगरसेवक सचिन मस्के हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते . यावेळी जिल्हा प्रबंधक अनिल बनसोडे यांच्या हस्ते पंचरंगी धम्म ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळीबुद्धवंदनावधम्मध्वजगाथाव२२प्रतिज्ञायावेळीघेण्यातआल्या. यावेळी वैशाली बुद्ध विहार येथे नव्याने साकारत असलेल्या ग्रंथालयास शंभर ग्रंथ देण्याचे अनिल बनसोडे यांनी जाहीर केले. यावेळी प्रमुख पाहुणे विनोद खटके सचिन मस्के यांनी धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा देत मनोगत व्यक्त केले यावेळी पाहुण्यांचे स्वागत सूर्यभान लातूरकर,दामू कोरडे, अशोक सातपुते ,जगन्नाथ सुरवसे, महादू गायकवाड ,सवाई दादा,शुभम भुताळे, कुणाल कांबळे, लताबाई चिकटे, अनुराधा कांबळे ,छाया कांबळे, मीना सुरवसे,आदींनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केशव कांबळे यांनी केले धम्मपालन गाथेने व आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.



## जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांच्या पुढाकाराने क्रीडा संकुलात स्वच्छता अभियान दसरा, गांधी जयंती व धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त उपक्रम; शिस्तबद्धता व स्वच्छतेचा 'लातूर पॅटर्न'

लातूर : दसरा, महात्मा गांधी जयंती व धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांच्या पुढाकाराने जिल्हा क्रीडा संकुलात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. संकुल स्वच्छ, सुंदर व शिस्तबद्ध ठेवण्याचा संकल्प या उपक्रमातून करण्यात आला. कसगावडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर क्रीडा संकुल परिसरात शिस्तीचे वातावरण निर्माण झाले आहे. पूर्वी विस्कळीत असलेली पार्किंग व्यवस्था सुधारून पेव्हर ब्लॉकच्या जागी पार्किंग करण्याचे आदेश त्यांनी दिले. तसेच मैदानात डीजे वाजवणे, गोंगाट करणे, आरडाओरडा करणे यावर बंदी घालून खेळाडूंना खेळासाठी योग्य व अनुशासित वातावरण उपलब्ध करून दिले. दसऱ्याच्या सुट्टीत अनेक अधिकारी कुटुंबासोबत वेळ घालवत असताना कसगावडे मात्र क्रीडा संकुलात येऊन स्वच्छता अभियान राबवत असल्याचे कौतुक सर्वत्र होत आहे. अधिकारी असावा तर असा अशा शब्दांत नागरिक त्यांचे गौरव करत आहेत.



या स्वच्छता अभियानात दैनिक महावृत्तचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (मुंबई) जिल्हा शाखा, लातूर) चे जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते यांनीही सहभाग नोंदवला.

## लातूर येथे भव्य धम्म दीक्षा सोहळा संपन्न

लातूर :– भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा लातूर(प) तसेच विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, लातूर च्या संयुक्त विद्यमाने धम्म चक्र अनुवर्तन दिनाच्या निमित्ताने भव्य धम्म दीक्षा सोहळ्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क,लातूर येथे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात अधिकृत नोंदी करणाऱ्या १३५ नवदीक्षितांना भारतीय बौद्ध महासभेकडून प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.






या धम्म दीक्षा सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्षा आशाताई चिकटे होत्या. तसेच मंचावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर १३४ व्या जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुशीलकुमार चिकटे स्वागत अध्यक्ष डॉ. विजय अजनीकर सह भारतीय बौद्ध महासभेचे आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

बुद्ध, बाबासाहेब यांच्या प्रतिमांचे पूजन करुन त्रिसरण पंचशील देऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. आपल्या प्रास्ताविकातून जिल्हा उपाध्यक्ष गौतम बनसोडे यांनी उपस्थितांना बाबासाहेबांनी आपल्याला १९५६ साली धम्म दिला. त्यामुळे आपण जन्माने बौद्ध होत नाही त्यासाठी धम्माची विधिवत दीक्षा घ्यावी लागते, तरच आपण बौद्ध म्हणून गणले जाऊ, त्यामुळे येणाऱ्या पिढीने धम्म स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचे सांगून उपस्थितांना येणाऱ्या काळात अधिकृतपणे धम्म स्वीकारून भारतीय बौद्ध महासभेचे प्रमाणपत्र घ्यावे, असे आवाहन केले.

भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा हिशोब तपासणी राजाभाऊ उबाळे यांनी उपस्थितांना बाबासाहेबांनी सांगितलेल्या बावीस प्रतिज्ञा दिल्या. बौद्धाचार्य डी. पी. भोसले व लक्ष्मण कांबळे, वाल्मीक कांबळे रवींद्र राजेगावकर यांनी रीतसर धम्म दीक्षा दिली. लातूर शहरातील व परिसरातील उपासिक– उपसिकांनी धम्माचा स्वीकार केला. यात एकूण १३५ जणांनी अधिकृतपणे धम्माचा स्वीकार केला. या धम्मदीक्षेला महिला व पुरुषांचा सम प्रमाणात सहभाग होता.

धम्म दीक्षा समितीचे जिल्हा प्रमुख राहुल गायकवाड यांनी नवदीक्षितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घालून दिलेल्या बावीस प्रतिज्ञाचे पालन ठाम निश्चयाने करण्याचे आवाहन केले. ते पुढे म्हणाले की, पंचशीलाचे पालन तीन अंगानी करावे, काया, वाचा व मनाने कोणतेही अकुशल कर्म करू नये. तसेच उपोसथाबाबत सविस्तर माहिती देऊन त्याचे महत्व सांगितले.

अध्यक्षीय समारोप आशाताई चिकटे यांनी उपस्थितांना धम्म आचरणाचे महत्व पटवून देऊन केला. धम्माचे आचरण करून आपले भावी आयुष्य सुखकर करण्याचा संदेश दिला. सुशीलकुमार चिकटे यांनी नवदीक्षितांचे स्वागत करुन त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रमाणपत्राचे वाटप आशाताई चिकटे व सुशीलकुमार चिकटे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र क्षीरसागर व डिव्हिजन ऑफिसर विलास आल्टे यांनी केले. आभार अर्जून कांबळे सरांनी मानले. याप्रसंगी सरणत्तयने या धम्मपालन गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली.

# संपादकीय

## सागरी सामर्थ्यात भारत आघाडीवर

आता शक्तिसंतुलन केवळ हवाई आणि पायदळापुरतीच मर्यादित राहिलेले नाही. जागतिक राजकारण आणि आर्थिक हिताची पाळेमुळे महासागराच्या खोलीतही व्यापली आहेत. म्हणूनच जगभरातील देश नौदलाच्या आधुनिकीकरणावर भर देत आहेत. भारतही त्यापासून अपवाद राहिलेला नाही. एकीकडे चीनकडून सागरी हद्दीत घुसखोरी करण्याचे प्रयत्न केले जात असताना पाकिस्तानच्या पाणबुडी कार्यक्रमामुळे प्रादेशिक पातळीवर असंतुलन निर्माण झाले आहे. भूराजकीय विचार करून भारताने नौदलाच्या ताफ्याला भक्कमपणा आणण्यासाठी पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. २०२४-२५ या काळात नौदलाचा विस्तार आणि व्याप्ती पाहिल्यास आत्मनिर्भर आणि दूरदृष्टीचे आकलन होते. स्वदेशी पातळीवर युद्धनौकांची निर्मिती, बांधणी, संरक्षण सहकार्य आणि सामरिक मोहिमांतील यश पाहता भारतीय नौदल भक्कम रूप धारण करत असल्याचे निदर्शनास येते. जानेवारी २०२५ मध्ये भारतीय नौदलात तीन प्रमुख लढाऊ जहाजांचा समावेश झाला. यात आयएनएस नीलगिरी, आयएनएस सूरत आणि आयएनएस वाग्शीर. हे लढाऊ जहाज केवळ अत्याधुनिकच नाही, तर भारतीय जहाज बांधणीतील अत्युच्च नमुना आणि आत्मनिर्भरतेची साक्ष देणारे आहेत.

याशिवाय रशियाकडून मिळालेले आयएनएस 'तुशील'मध्ये परकी अवलंबित्व कमी करताना ९० टक्के स्वदेशीवर भर दिला आहे. आता नौदलाकडे १३० पेक्षा अधिक सक्रिय लढाऊ जहाज आहेत आणि २०३५ पर्यंत या जहाजांची संख्या २०० वर नेण्याची योजना आहे. त्यामुळे याकडे केवळ आकडेवारी म्हणून न पाहता कुशल रणनीतीचादेखील तो भाग ठरत आहे. भारताने आपल्या सागरी रणनीतीला केवळ देशांतर्गतच निर्मितीपुरती मर्यादित ठेवले नाही. फ्रान्ससमवेत २६-राफेल एम लढाऊ विमानांचा आणि तीन नवीन स्कॉर्पिन पाणबुड्यांचा व्यवहार आयएनएस विक्रांतची क्षमता वाढविणार्या आहेत. त्याचवेळी जर्मनच्या थिसेनक्रूपच्या मदतीने सहा पाणबुड्यांच्या निर्मितीचा करार आपल्या पाणबुडी कार्यक्रमाला जागतिक पातळीवर अधोरेखित करणारा आहे. या सहकार्याचा प्रभाव केवळ शस्त्र प्रणालीपुरताच मर्यादित राहणार नाही. वरुणा, मालाबार, मिलान यासारख्या नौदल सरावातून भारतीय सागरी कूटनीतीला बळकटी दिली आहे. त्यामुळे हिंद प्रशांत भागात भारत एक निर्णायक भूमिकेत अस्तित्वात येत आहे.

भारताचे नौदल प्रबळ होत असताना पाकिस्तान देखील चीनच्या मदतीने सागरी शक्ती वाढविण्याचे काम करत आहे. पाकिस्तानला ८ हांगोर श्रेणीतील पाणबुडी अण्वस्त्रसज्जता करणारी आहे आणि परिणामी प्रादेशिक संतुलनाला आव्हान मिळू शकते. त्यामुळे पाकिस्तानची सेकंड स्ट्राईक कॅपेबिलीटीची क्षमता विकसित होऊ शकते आणि ही बाब भारताला डोकेदुखी ठरू शकते. प्रामुख्याने बाबर-३ क्षेपणास्त्र सज्ज असलेल्या पाणबुड्या अरबी समुद्रात भारताच्या सामर्थ्याला काही प्रमाणात आव्हान देऊ शकतात. त्यामुळे भारतासाठी एएसडब्ल्यू (अँटिसबमरीन वॉरफेअर) क्षमता अणि देखरेख प्रणालीतील गुंतवणूक आवश्यकच नाही, तर अनिवार्य झाली आहे. दि. १८ जुलै २०२५ रोजी नौदलात आयएनएस निस्तार ही भारताच्या सागरी शक्तीतील मैलाचा दगड ठरली. त्याचवेळी आधुनिक डायव्हिंग सपोर्ट व्हिसल ही ८० टक्के स्वदेशी तंत्रज्ञानाने तयार झालेली असून ती समुद्रात ६५० मीटरपर्यंत बचावकार्य राबविण्यास सक्षम आहे. यात साईड स्कॅन सोनार, आरओव्ही आणि डीप सी डायव्हिंग सिस्टीम यासारख्या उच्च प्रतीच्या प्रणाली आहेत. सिंगापूर येथे पॅसेफिक रीच २०२५ च्या युद्ध सरावात सहभागी झालेले निस्तार हे भारतीय नौदलाचे तंत्रज्ञान, कुटनीती आणि जागतिक सहकार्य असा त्रिवेणी संगमाचे प्रतीक दाखविणारे ठरले.

# महागाईचा धोका कायम

सध्या आर्थिक क्षेत्रात बर्याच उलथापालथी होत आहेत. विदेशी धोरणे, सरकारी धोरणे, लहरी निसर्ग याचा थेट परिणाम लोकांच्या आर्थिक जीवनावर होतो. त्यामुळे महागाईचा धोका कायम राहणार आहे, असे दिसते.

देशातील गृहनिर्माण आणि बांधकामक्षेत्राचा विकास करण्याकरिता 'नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल' अर्थात 'नरेडको'ची स्थापना करण्यात आली आहे. तिच्या महाराष्ट्र विभागाकडून 'होमथॉन प्रोपर्टी एक्सपो २०२५' याचे आयोजन मुंबईत करण्यात आले होते. त्यावेळी एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक गृहनिर्माण प्रकल्पांचे अनावरण करण्यात आले. दिवाळीमध्ये देशभरात १ लाख ३५ हजार ते १ लाख ४० हजार घरे विकली जाऊ शकतात, असा अंदाज आहे. घरखरेदीच्या व्यवहारांमध्ये १५ ते २० टक्क्यांची वाढ दिसत असून, प्रमुख शहरांमध्ये तिमाहीत दुप्पट वाढ दिसत आहे. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने ही आश्वासक बाब आहे.

दुसरीकडे, औषधांवर अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शंभर टक्के आयातशुल्क लादण्याचा निर्णय घेतला असला, तरी त्याचे भारताच्या दृष्टीने परिणाम मर्यादित राहतील, असा विश्वास या क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केला आहे. याचे कारण, त्यांचा आदेश हा केवळ स्वामित्व हक्क, म्हणजेच पेटंट आणि नाममुद्रित, म्हणजेच ब्रॅण्डेड औषध उत्पादनांनाच लागू होणार आहे. भारतीय कंपन्यांकडून निर्यात होत असलेल्या जेनेरिक औषधांवर आयात शुल्काचा कोणताही परिणाम होणार नाही. डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीज, सन फार्मा, ल्युपिन, झायडस लाइफ सायन्सेस यासह आघाडीच्या २३ भारतीय कंपन्या अमेरिकेत मुख्यतः जेनेरिक औषधांची निर्यात करतात. भारत हा दीर्घकाळापासून परवडणार्या व उच्च गुणवत्तेच्या औषधांच्या जागतिक पुरवठा साखळीचा एक महत्त्वाचा घटक आहे. अमेरिकेच्या औषधांच्या गरजांपैकी ४७% पुरवठा भारतातून होतो.



या सर्व पार्श्वभूमीवर, विद्यमान आर्थिक वर्ष २०२५-२६मध्ये मजबूत देशांतर्गत मागणीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेची धाव कायम राहील, असा आशावाद एस अँड पी ग्लोबलने व्यक्त केला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून पुढेही व्याजदरात माफक कपात केली जाण्याची शक्यता आहे. चालू आर्थिक वर्षासाठी भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर ६.५% राहणार असल्याचे एस अँड पी चे अनुमान आहे. मुख्यतः हंगामी पाऊस मोठ्या प्रमाणात अनुकूल असल्याने देशांतर्गत मागणी वाढली आहे. परिणामी, चालू आर्थिक वर्षासाठी महागाई दराचा अंदाज ३.२% पर्यंत कमी करणार्या रिझर्व्ह बँकेकडून आगामी पतधोरण बैठकीत रेपो दरात २५ आधारबिंदूंची कपात केली जाईल, अशी अपेक्षा आहे. सरलेल्या एप्रिल-जून २०२५च्या तिमाहीत देशाचे सकल देशांतर्गत उत्पादन, अर्थात जीडीपी वाढीचा दर ७.८% होता. त्यामुळे ३१ मार्च २०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात विकासदर ६.५ टक्क्यांवर राहू शकेल.

अनुकूल मान्सून, त्या परिणामी वाढलेले उत्पन्न, वस्तू आणि सेवा करात झालेली कपात आणि सरकारी गुंतवणुकीला मिळालेली गती यामुळे देशांतर्गत मागणी मजबूत राहील, असे दिसते. अन्नधान्याच्या महागाईत अपेक्षेपेक्षा जास्त घट झाल्यामुळे चालू वर्षात भाववाढ कमी राहण्यास मदत होईल. महागाई आटोक्यात असल्यामुळे रिझर्व्ह बँकेला पतधोरणाच्या माध्यमातून टप्प्याटप्प्याने रेपोदरात कपात करण्यास वाव आहे. परिणामी, चालू आर्थिक वर्षात आणखी २५ आधारबिंदूंची कपात होण्याची अपेक्षा आहे. अमेरिकेकडून आयातशुल्कात करण्यात आलेली वाढ आणि मंदावलेली जागतिक वाढ यानंतरही देशांतर्गत मागणी मात्र मजबूत आहे, असे एकूण चित्र आहे.

मात्र गेल्या दोन महिन्यांत महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. एकूण १९५ तालुक्यांमधील शेतीपिके उद्ध्वस्त झाली आहेत. धाराशिव जिल्ह्यातील सव्वातीन लाख हेक्टरवरील पिके मातीमोल झाली आहेत. बीड, सोलापूर, परभणी वगैरे जिल्ह्यातील परिस्थितीदेखील बिकटच आहे. राज्यातील ३० जिल्ह्यांमधली शेती बाधित झाली आहे. सोयाबीनसारख्या पिकांची काढणी काही दिवसांत झाली असती. मात्र या अतिवृष्टीने शेतकर्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून नेला आहे.

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात सिंधपण्णा, डोंबरी आणि विद्रूपा नदीचा संगम शिरसमार्ग या गावात होतो. महाराष्ट्रातील 'मोसंबी हब' म्हणून हे गाव ओळखले जाते. तेथील तीन हजार एकरावरील मोसंबी पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून, पाच हजार शेतकर्यांना २०० कोटी रुपयांचा फटका बसला आहे. येथील मोसंबी संपूर्ण देशात धाडली जातात. झाडावर फळे आली असून, सौदेही झाले होते. परंतु माल तोडायच्या आतच बागा उन्मळून पडल्या. पूर आणि पाण्यामुळे सगळीकडे चिखल झाला असून, शेकडो फळे आता गळून पडत चिखलात जात आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सोयाबीन, मका, कापूस, उडीद, तूर, मूग, भाजीपाला, भात, बाजरी, ज्वारी, कांदा, हळद आणि फळबागांचे नुकसान झाले आहे. नांदेड, बीड, सोलापूर, यवतमाळ आणि वाशिम हे सर्वाधिक नुकसान झालेले पाच जिल्हे आहेत.

तिकडे, रावी, बियास आणि सतलज नद्यांच्या पुरात पंजाबमध्ये शेकडो लोक विस्थापित झाले आणि तीन लाख एकरपेक्षा जास्त पिकांचे नुकसान झाले. ४२ हजार हेक्टर जमिनीवरील भातपिके हातातून गेली आहेत. त्याचप्रमाणे गहू, ऊस, मका या पिकांचीही हानी झाली आहे. पंजाबमध्ये हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करण्यात आली असून, महाराष्ट्रातही तेवढ्याच मदतीची मागणी केली जात आहे. मात्र यातील महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, या सगळ्यामुळे देशातील धान्य वा अन्य शेतमालाचा पुरवठा कमी होणार असून, मूळ अंदाजापेक्षा अधिक प्रमाणात महागाई होण्याची भीती आहे. हे लक्षात घेऊन केंद्र सरकारला राज्यांना मदत करतानाच, आपल्या वित्तीय धोरणांची फेरआखणी करावी लागेल.

# बालिशपणा

दुबईमध्ये पार पडलेल्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेतील विजेता निश्चित झाला असला आणि भारताने अंतिम सामन्यात पाकिस्तानवर मात करून या करंडकावर नाव कोरले असले, तरी अद्यापही या स्पर्धेवरून निर्माण झालेला वादविवाद सुरूच आहे. आशियाई क्रिकेट कौन्सिलचे अध्यक्ष आणि पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाचे पदाधिकारी मोहसीन नक्वी यांनी विजेता कर्णधार सूर्यकुमार यादवला प्रदान केली नाही ती ट्रॉफी घेण्यासाठी सूर्यकुमारने दुबईमध्ये यावे, अशी सूचना केली आहे. गेल्या रविवारी जेव्हा अंतिम सामन्यामध्ये भारताने पाकिस्तानवर मात करून स्पर्धेचे विजेतेपद मिळवले तेव्हा विजेता संघ मोहसीन नक्वी यांच्याकडून ट्रॉफी किंवा मेडल्स घेणार नाही हे आधीच ठरले होते. त्याची कल्पना असूनही समारंभामध्ये नक्वी यांनी गोंधळाचे वातावरण निर्माण केले.

मी एखाद्या कार्टूनप्रमाणे भारतीय खेळाडूंची वाट बघत उभा होतो अशा प्रकारचे विधान नंतर नक्वी यांनी केले आणि आपण खरोखरच कार्टून आहोत हे ते सातत्याने सिद्ध करत आहेत. पाकिस्तानचे गृहमंत्री असलेल्या आणि भारताविरोधात सतत गरळ ओकणार्या आणि भारतावर अणुहल्ल्याची धमकी देणार्या मोहसीन नक्वी यांच्याकडून आम्ही विजयी ट्रॉफी स्वीकारणार नाही याची कल्पना भारतीय संघ व्यवस्थापनाने आधीच पाकिस्तानला आणि आयसीसीला दिली होती. अंतिम सामन्याच्या बक्षीस वितरण समारंभात नक्वी यांच्याऐवजी कोणाकडूनही ट्रॉफी आणि मेडल स्वीकारण्याची तयारी भारतीय संघ व्यवस्थापनाने केली होती.





पण त्यावेळी मोठे मन दाखवायची संधी उपलब्ध झाली असतानासुद्धा मोहसीन नक्वी यांनी गल्ली क्रिकेटमधील मानसिकता दाखवून ट्रॉफी अन्य कोणाच्या हस्ते भारतीय संघाला न देता सरळ ती ट्रॉफी घेऊन ते आपल्या हॉटेलच्या रूममध्ये परतले होते. या विषयावरून वादंग निर्माण होणार आणि आयसीसीकडून किंवा बीसीसीआयकडून जाब विचारला जाणार याची खात्री असल्यानेच नक्वी यांनी या संपूर्ण विषयाबाबत पडदा टाकण्याचा जरी प्रयत्न केला असला, तरी त्यांनी ही ट्रॉफी मिळवण्यासाठी भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादवने दुबईमध्ये यावे, अशी सूचना करून हा वाद न मिटवता उलट वाढवायचाच प्रयत्न केला आहे. कारण आता आशियाई क्रिकेट समितीचे सर्व पदाधिकारी आणि नक्वी आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे सर्व पदाधिकारीसुद्धा पाकिस्तानात परतले आहेत. सूर्यकुमार यादवने भर मैदानात नक्वी यांच्याकडून ट्रॉफी घ्यायला नकार दिला. सूर्यकुमार किंवा इतर संघ सहकारी फक्त ट्रॉफी नेण्यासाठी पुन्हा एकदा दुबईला जातील असे मानणे म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे. बीसीसीआयने याच शब्दांमध्ये नक्वी यांना सुनावले आहे. अर्थात, आपली विचित्र विधाने आणि आपली विचित्र कृती यासाठी नेहमीच प्रसिद्ध असलेले हे पाकिस्तानचे गृहमंत्री महाशय नेहमीच कार्टून असल्याच्या अविर्भावातच वावरत असतात.

भारत-पाकिस्तान यांच्यामध्ये लष्करी संघर्ष सुरू असतानाही विविध प्रकारची विचित्र विधाने करून मीडियाचे लक्ष आपल्यावर कसे राहील याकडेच त्यांचे प्राधान्य असे. क्रिकेटमध्ये किंवा इतर कोणत्याही खेळामध्ये अशा प्रकारे राजकारण आणू नये असे बजावणार्या नक्वी यांनीच या सर्व विषयाला सुरुवात केली होती हेसुद्धा नाकारून चालणार नाही. आशियाई क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी ही स्पर्धा व्यवस्थित पार पाडणे आवश्यक होते. बक्षीस समारंभाच्या वेळी मोठ्या मनाने त्यांनी तेथील दुबईचे पदाधिकारी किंवा बांगलादेशचे पदाधिकारी यांच्या हस्ते जर ट्रॉफी दिली असती, तर हा विषय निर्माण झाला नसता आणि वाढला नसता.

अतिशय अहंकारी वृत्तीचे आणि बालिश पद्धतीने वर्तन करणारे नक्वी यांच्याकडून तशी अपेक्षाच नव्हती. सूर्यकुमारने ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिल्यावर ती ट्रॉफी आपल्या हॉटेल रूममध्ये नेऊन नक्वी यांनी आपल्या बालिशपणाचा आणि कार्टूनपणाचा कळस दाखवून दिला. आयसीसी किंवा बीसीसीआय या विषयावर कठोर भूमिका घेण्याच्या तयारीत असल्याच्या बातम्या समोर आल्यानंतरही नक्वी यांनी विजयी ट्रॉफी सूर्यकुमार यादवला सहजासहजी देण्यास मात्र नकार दिला आहे आणि भारतीय संघ व्यवस्थापनालासुद्धा आता ती ट्रॉफी परत घेण्यात कोणताही रस नाही. त्या दिवशी मैदानावर हातात ट्रॉफी नसतानाही सूर्यकुमार आणि त्याच्या सहकार्यांनी वेगळ्या प्रकारे सेलिब्रेशन केले होते.

आशिया करंडक स्पर्धेचा चॅम्पियन भारत आहे याची नोंदही कागदावर झाली आहे. त्यामुळे ट्रॉफी हातात येवो किंवा न येवो भारत हाच चॅम्पियन आहे याबाबत कोणीही शंका घेऊ शकत नाही. मोहसीन नक्वी किंवा पाकिस्तानमधील इतर पदाधिकार्यांनी कितीही बालिश विधाने केली तरी त्याला बीसीसीआय किंवा भारतीय संघ व्यवस्थापन फारसे महत्त्व देईल असे नाही. एक मात्र निश्चित की लवकरच जेव्हा आयसीसीची मिटिंग होणार आहे. त्या मिटिंगमध्ये बीसीसीआय हा विषय उचलून धरणार आहे आणि मोहसीन नक्वी यांच्यावर आणखीन मोठी कारवाई करण्याचा आग्रहही केला जाईल अशी शक्यता आहे.

विजेत्या संघाला ट्रॉफी नाकारणे हे अत्यंत चुकीचे आहे, अशाच प्रकारची भूमिका बहुतेक क्रिकेट संघटनानी घेतल्यामुळे आपण या विषयावर उघडे पडले आहोत हे नकवी यांच्या लक्षात आले आहे. विजेत्या संघाला ट्रॉफी नाकारणार्या अधिकार्यावर कारवाई होणे अत्यंत गरजेचे आहे. तरच सभ्य गृहस्थांचा खेळ म्हणून ओळखल्या जाणार्या क्रिकेटमध्ये पुन्हा एकदा सभ्यपणा प्रस्थापित केला जाईल.

# संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याचा पहिल्या गळीत हंगामाचा शुभारंभ शेतकरी हेच दैवत समजून श्री.संत गुपाळबुवा साखर कारखाना शेतकऱ्यांना न्याय, स्थैर्य आणि स्वाभिमान देणार- आ. कराड

लातूर :– थोर विभूती आणि संत महात्म्यांचा आशीर्वाद असल्याने श्री. संत गोपाळबुवा महाराज साखर कारखाना अल्पावधीत निश्चितपणे भरभराटीस येईल. या कारखान्याच्या माध्यमातून शेतकरी हेच दैवत समजून शेतकऱ्यांना स्थैर्य, स्वाभिमान आणि न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल असे प्रतिपादन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर – जवळा परिसरात उभारण्यात आलेल्या श्री संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याच्या पहिल्या गळीत हंगाम शुभारंभ प्रसंगी बोलताना केले.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि त्यांच्या हिताची जपणूक व्हावी यासाठी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर – जवळा परिसरात उभारण्यात आलेल्या श्री संत गोपाळ बुवा महाराज शुगर अँड अँग्रौ इंडस्ट्रीज प्रा. लि. रामेश्वर या साखर कारखान्याचा पहिला चाचणी गळित हंगामाचा शुभारंभ विजयादशमीच्या दिवशी गुरुवार रोजी पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष हभप गहीनीनाथ महाराज औसेकर, प.पु. विद्यानंद सागर महाराज गातेगावकर, हभप नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, हभप बाबा महाराज बोराडे काटगावकर आणि हभप लालासाहेब महाराज देवळेकर यांच्या शुभहस्ते आणि लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख अँड. बळवंतराव जाधव, जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष नाथसिंह देशमुख, अंबाजोगाई साखर कारखान्याचे व्हॉईस चेअरमन दत्तात्र्यआबा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत गव्हाणीत ऊसाची मोळी टाकून मोठ्या उत्साहाच्या वातावरणात करण्यात आला.

याप्रसंगी संत गोपाळबुवा महाराज साखर कारखान्याचे मुख्य प्रवर्तक तुळशीराम अण्णा कराड, चेअरमन राजेश कराड, अंबाजोगाई कारखान्याचे माजी चेअरमन ओम प्रकाश गोडभरले,




भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, ऋषिकेश कराड, रणवीर कराड, पृथ्वीराज कराड, नवनाथ भोसले, अनिल भिसे, रविकांत औसेकर, बन्सी भिसे, पद्माकर चिंचोलकर, सुरज शिंदे, महेंद्र गोडभरले, उद्धव काळे, प्रताप पाटील, गोविंद नरहरे, अनंत चव्हाण, गोपाळ पाटील, भैरवनाथ पिसाळ, दशरथ सरवदे, साहेबराव मुळे, विजय काळे, बाबा भिसे, बालाजी दुटाळ, बालासाहेब कदम यांच्यासह कारखाना उभारणी ठेकेदार बस्वराज बर्गे, फॅब्रिकेशनचे ठेकेदार शहाजी ढोगे आणि कारखाना उभारणी इंजिनियर सुनील बिराजदार व इतर अनेकांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या स्वप्नपूर्ती कार्यक्रमास कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकरी सभासद मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

गेली पंचेवीस वर्ष मी माझ्या राजकीय सामाजिक जीवनात पहिल्या दिवसापासून शेतकऱ्यांच्या स्वाभिमानासाठी संघर्ष केला, न्याय हक्कासाठी लढलो यामुळेच आपण मला मोठा आशीर्वाद देऊन विधानसभेत पाठवले लातूर ग्रामीण मतदार संघात नवी क्रांती घडवली याचा मला सार्थ अभिमान असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, शेतकऱ्यांचे अश्रू पुसावेत त्यांना आधार देता यावा यासाठी शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांच्या मनातील स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न मातीशी जुळलेल्या कराड कुटुंबीयांनी संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याची उभारणी करून संकल्प पूर्ण केला आहे.

गेली अनेक वर्ष ऊस उत्पादक शंतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची आडवणूक, पिळवणूक होत होती आम्ही उघडया डोळयांनी पाहत होतो हातात कांहीच नसल्याने काहीही करु शकत नव्हतो. छोटा का असेना पण शेतकऱ्यांच्या हक्काचा संत गोपळबुवा साखर कारखाना उभा राहीला. कारखान्याच्या प्रशासनाने व्यवसाय म्हणून कारखाना चालवत असताना काटेकोर, काटकसरीने कारभार करावा आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा असेही आ. कराड यांनी बोलून दाखविले.

याप्रसंगी गहिनीनाथ महाराज औसेकर, विद्यानंद सागर महाराज, नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर, बाबा महाराज बोराडे यांनी कराड कुटुंबीयांची समाज हिताच्या विविध कार्याची माहिती देऊन शेतकऱ्यांना सशक्त करण्याचे काम कराड परिवाराने हाती घेतले आहे निश्चितच हा प्रकल्प यशस्वी होईल असे आशीर्वाद दिले. तर बळवंतराव जाधव आणि नाथसिंह देशमुख यांनी कराड कुटुंबीयांच्या साखर कारखान्याच्या उभारणीमुळे मांजरा परिवाराच्या साखर कारखान्यांना गाळपापूर्वीच भाव जाहीर करावा लागला असल्याचे सांगून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य द्यावे असे बोलून दाखवले.

कारखान्याचे चेअरमन राजेश कराड यांनी पैसा कमवण्यासाठी अथवा राजकारण करण्यासाठी कारखान्याची उभारणी केली नाही तर शेतकऱ्यांना योग्य भाव, उसाचे अचूक वजन, मान सन्मान देण्यासाठी संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याची उभारणी केली असून या कारखान्यात कसलेही राजकारण नाही तर केवळ शेतकरी हितच असेल असे आपल्या प्रास्ताविकातून बोलून दाखवले. शेवटी सर्व उपस्थितांचे ऋषिकेशदादा कराड यांनी आभार व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. प्रारंभी उपस्थित सर्व मान्यवरांचा कारखान्याच्या वतीने यथोचित सत्कार करून स्वागत करण्यात आले या गळीत हंगाम शुभारंभास लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील अनेक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, ऊस उत्पादक, शेतकरी सभासद, भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुईनगर येथे ज्येष्ठ नागरिकांचा सामुदायिक वाढदिवस उत्साहात साजरा

नवी मुंबई / के. एच. हनवते :– ज्येष्ठ नागरिक संस्था (जुईनगर) यांच्या वतीने विरंगुळा केंद्र चिंचोली तलाव जुईनगर येथे ज्येष्ठ नागरिकांचा सामुदायिक वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांनी अगदी मनमोकळे पणाने दिलखुलाश सदाबहार मराठी, हिंदी सिनेमा गीते, भक्ती गीत, लोकगीत सादर करून श्रोत्यांची मने जिंकली. सदर कार्यक्रमात धम्माला वाहून घेतलेले व धम्माचा प्रचार आणि प्रसार करणारे ज्येष्ठ नागरिक (बर्थ डे बॉय) आयुष्यमान : बाबासाहेब साळे यांनी नेहमी प्रमाणेच आपले बुद्ध–भीम गीत श्री बुद्धाच्या चरणा वरती विजयादशमी दिनी दिक्षा आम्हा दिली भिमाने मंगल दिन तो जनी, आणि




तिरंग्यावरती अशोक चक्र आढळ ठेवलयरं पुसणार नाही आसच अक्षर भिमान लिव्हलयरं इत्यादी गित गाऊन आपला आनंद व्यक्त केला, त्याप्रसंगी समाजसेवक : संजय गायकवाड, बौद्धाचार्य : कल्याणराव हनवते यांनी कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून सर्व ज्येष्ठ नागरिकांना वाढदिवसाच्या मंगलमय हार्दिक शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक आयु. बाबासाहेब साळे, श्री बुद्धेश्वर गोविंद दरेकर, श्री पोपट विठ्ठल ससाने, श्री गंगाधर भुमरया सोम, श्री सुभाष गायकवाड, श्री शशिकांत धोंडीबा मेहर, श्री बळवंत आर. राव, श्री शशिकांत रामनाथ चारी, श्री सुनील शंकर पवार, श्री सुनील दत्तात्रय राणे, श्री रामानुजम इत्यादी ज्येष्ठ नागरिकांचा सामुदायिक वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच ज्येष्ठ महिला सौ. सुरेखा शशिकांत मेहेर, सौ. स्नेहल सिताराम नाईक, सौ जयश्री विश्वास निकम इत्यादी महिलांचा ७५ वा वाढदिवस अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी जेष्ठ नागरिक संस्था जुईनगर अध्यक्ष श्री. भरत शंकर कवडे, सचिव श्री नामदेव महाडेश्वर सह विरंगुळा केंद्र सभासद व महिला सभासद शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री हे देशाची विजयी प्रतिके–डॉ. वसुदेव गायकवाड

केज/ प्रतिनिधी स्वानंद सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे २ आक्टोंबर २०२६ रोजी विजयादशमी, महात्मा गांधी जयंती, लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने व्याख्यान, परिसंवाद इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रम घेवून साजरे करण्यात आले. विजयादशमी, महात्मा गांधी, लालबहादर शास्त्री हे देशाच्या विजयाची प्रतिके असल्याचे प्रतिपादन व्याख्यान समयी व्याख्यात, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक डॉ. वसुदेव गायकवाड यांनी केले. या व्याख्यानात त्यांनी विजयादशमी, महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री इत्यादी विषयी सविस्तर विवेचन केले. हि महान व समृद्ध प्रतिके आपण जपली पाहिजेत असे प्रतिपादन डॉ. वसुदेव गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच रामराजे गायकवाड हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून रावसाहेब जाधव, एस. पी. गायकवाड ( सेवानिवृत्त ग्रामसेवक), आरुण



गायकवाड, एस. के. वैरागे यांची उपस्थिती होती. त्यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर याच विषयावर परिसंवाद घेण्यात आला. या परिसंवाद कार्यक्रमात रविंद्र गायकवाड, आण्णासाहेब भोगजकर, रावसाहेब गायकवाड, सुखदेव गायकवाड, बबन पुंड, संजय सोनवणे यांनी सहभागी होवून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते व परखड व्याख्याते डॉ. वसुदेव गायकवाड हो होते. सर्व कार्यक्रमाचे प्रसारिक, सुत्रसंचलन व आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी केले

# बीड जिल्हास्तरीय रायफल शुटिंग स्पर्धेत चि. तानाजी काळे याने पटकावला प्रथम क्रमांक

बीड/प्रतिनिधी बीड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या बीड जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत १० मीटर (वय गट:१७) शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थी तानाजी काळे याने यशस्वी कामगिरी करून प्रथम क्रमांक मिळवत श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. चि. तानाजी काळे याच्या या उज्वल यशाबद्दल त्याच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ४ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी तानाजी सुभाष काळे या विद्यार्थ्यांस पिस्तोल शुटिंगची लहानपणापासून आवड आहे. ही आवड जोपासण्यासाठी तो सातत्याने धडपड करत आहे. तो दररोज सराव करून या स्पर्धेत अधिक निपुण होण्यासाठी तो प्रयत्नशील असतो. त्याने आता पर्यंत विविध स्पर्धासह शालेय स्तरावरील स्पर्धेत तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तरावर पिस्तोल शुटिंग स्पर्धेत भाग घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. काल बुधवार दिनांक १ ऑक्टोबर रोजी बीड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने जिल्हास्तरीय रायफल शुटिंग स्पर्धा १० मीटर (वय गट:१७) बलभीम महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेसाठी चि. तानाजी सुभाष काळे सहभागी झाला होता. या स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक मिळून त्याने श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. त्याच्या या यशाबद्दल त्याचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश वाघ सर, सचिव नामदेव वाघ सर, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, गावातील प्रतिष्ठित नागरिक राजेश भाऊ देवकते, संतोष नरवडे, त्याचे वडील सुभाष काळे, शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय चव्हाण सर, आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे, श्रीमती साळुंके, श्रीमती सानप मॅडम यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासह, नातेवाईक आणि मित्र परिवारांनी त्याचे अभिनंदन करून त्यास पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. येत्या ४ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. या स्पर्धेसाठी त्याला सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

# केज येथे धनगर समाज बांधवांचे रस्ता रोको आंदोलन

केज/प्रतिनिधी जालना येथे गेल्या पंधरा दिवसापासून दीपक भिमराव बोराडे हे आमरण उपोषणास बसलेले आहेत परंतु शासनाने अद्यापही बोराडे यांच्या उपोषणाची दखल घेतली नाही म्हणून केज येथे धनगर समाज बांधवासह मेंढ्या घेऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, धनगर समाज बांधवांना एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी जालना येथे दीपक भिमराव बोराडे हे मागील पंधरा दिवसापासून आमरण उपोषण करत आहेत परंतु त्यांच्या मागणीची प्रशासनस्तरावर अद्यापही दखल घेण्यात आलेली नाही म्हणून दिनांक १ ऑक्टोंबर २०२५ रोजी केज शहरासह तालुक्यातील धनगर समाज बांधवांनी एकत्र येत शहरातील अहिल्यादेवी नगर येथून मेंढ्यासह ढोल ताशाच्या गजरात भव्य मोर्चा रॅली काढून श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रस्ता रोको आंदोलन करून दीपक भीमराव बोराडे यांच्या आमरण उपोषणास पाठिंबा दर्शविला आहे. धनगर समाज बांधवांनी वेळोवेळी आंदोलन करून धनगर समाज बांधवांना एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे ही प्रमुख मागणी गेल्या अनेक वर्षांपासून लावून धरली असताना वेळोवेळी लेखी व तोंडी आश्वासन देण्यात आली परंतु प्रत्यक्षात आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.सन १९५६ पासून धनगर समाज धनगड ऐवजी धनगर जमाती म्हणून घोषित करण्यासाठी आंदोलन करत आहे महाराष्ट्र सरकारने अभ्यास केला आहे आणि असे आढळून आले आहे की,महाराष्ट्र राज्यात धनगड जमात ही अस्तित्वात नाही आणि धनगर ही महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात असलेली जमात आहे. महाराष्ट्र राज्यांनी या वस्तुस्थितीला सहमती दर्शविली आहे आणि डब्ल्यूपी क्रमांक४९१९/२१७ मध्ये मुंबई उच्च न्यायालयातील प्रतिज्ञापत्रे सादर केली आहेत, ज्यामध्ये महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच याचीकाकर्ते म्हणून होते आणि महाराष्ट्र राज्य सरकार प्रतिवादी होते यासह विविध मागण्याचे निवेदन केज तहसीलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी स्वीकारले. या लेखी निवेदनावर बाळासाहेब गाढवे, अजय रोडे, बालाजी जाडकर, विलास करडे, संजय गाढवे, काशिनाथ रोडे, भारत शिंपले, वैजिनाथ गाढवे, पिंटू रोडे, सिद्धार्थ गाढवे यांच्यासह धनगर समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# केज शहरातील महात्मा फुलेनगर येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा

केज/प्रतिनिधी केज शहरातील महात्मा फुले नगर भागातील एल.एफ.सी. चौक येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे. यावेळी केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करून उपस्थित मान्यवरांच्या व उपस्थितांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूप–दिपाणी पूजा करून वंदन करण्यात आले,यावेळी सामुदायिक बुद्ध वंदना ग्रहण करण्यात आली. यावेळी नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, धनराज सोनवणे, बाळासाहेब मस्के, अशोक गायकवाड, पत्रकार तात्या गवळी, प्रा. विठ्ठल समुद्रे, विठ्ठल जाधव, संदिपान गायकवाड, विवेक बनसोड, अमोल मिसाळ, किरण जोगदंड, राहुल इनकर, सुरज वैरागे, प्रेम मस्के, बालासाहेब जोगदंड, महादेव गायकवाड, धनराज भालेराव, आप्पा गायकवाड, प्रा.पवन सरवदे, समुद्रे दादा, ओम शिनगारे, संदेश ताकतोडे, आदर्श गवळी, महानंदा गायकवाड, मीरा गवळी, बबीता मस्के,







विमल जोगदंड, लता वाघमारे, मस्के आक्का, सुमन घुमरे, ज्योती शिरसट, उजगरेबाई, काळे ताई, सावन लोंढे, धम्मानंद वाघमारे, प्रीतम मस्के यांच्यासह महात्मा फुले नगर भागातील बौद्ध उपासक–उपासिका उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप हा शरणतय घेऊन करण्यात आला.

# वसुंधरा पायी दिंडी २०२५ चे केज शहरात जंगी स्वागत

केज/प्रतिनिधी जगतगुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज यांची दिंडी दिनांक २८ सप्टेंबर २०२५, मराठवाडा येथील श्रीक्षेत्र माउली माहेर जिल्हा परभणी येथे वसलेल्या जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी स्थापित रामानंद संप्रदाय, मराठवाडा (परभणी) उपपीठाहून पायी दिडीचे प्रस्थान २८ सप्टेंबर २०२५ रोजी झालेले आहे. या पायी दिंडी मध्ये हजारो भाविक परभणी पासून श्रीक्षेत्र नाणीजधाम (रत्नागिरी) पर्यंत शेकडो किलोमीटरचा प्रवास पायी चालून जाणार आहेत. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या २१ ऑक्टोबर २०२५ रोजी ५९ वा वाढदिवस येत आहे. रामानंद संप्रदायाचे मुख्यपीठ नाणीजधाम येथे हा उत्सव या दिवशी अनेक वर्ष साजरा केला जातो. त्यादिवशी हि दिडी नाणीजधाम येथे दाखल होणार आहे. मराठवाडा (परभणी) उपपीठ सोबतच तेलंगणा उपपीठ, उत्तर महाराष्ट्र (नाशिक) उपपीठ, पूर्व विदर्भ(नागपूर) उपपीठ, मुंबई उपपीठ (वसई), पश्चिम महाराष्ट्र (पुणे) व गोवा या ७ उपपिठाहून देखील अश्याच प्रकारे पायी दिंड्या निघणार आहेत. या दिंडीला वसुंधरा पायी दिंडी असे नाव देण्यात आले आहे. या दिडीतून, सध्या अत्यंत जिकरीच्या पण तेवढ्याच दुर्लक्षित असलेल्या ग्लोबल वॉर्मिंग या विषयावर प्रकाश टाकला जात आहे. यावर केवळ संदेशच न देता त्यांच्या कृतीतूनही संदेश देण्याचा प्रयत्न केलेला आहे. हजारो लोकांची खाण्या पिण्याची, राहण्याची, मलमूत्र विसर्जनाची, अंघोळीची सोय करताना पर्यावरणाला काहीही हानी होणार नाही याची काळजी आयोजकांकडून घेतली जात आहे. मागे कचरा होणार नाही याची खबरदारी घेण्यासाठी विशेष सेवेकरींचे पथक या दिंडीत सामील आहे. सोबत टॉयलेट व्हॅन देखील तैनात आहे, तसेच सोबत पिण्याचे पाणी, आणि स्वच्छतेसाठी लागणारे पाणी घेऊन २ स्वतंत्र टँकर्स देखील दिंडी सोबत कायम सज्ज आहेत. त्याचसोबत या दिंडीच्या माध्यमातून दरदिवशी वृक्षारोपण देखील केले जात आहे. विशेष म्हणजे हि दिंडी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने रस्त्याच्या एका बाजूने, एका रांगेत, एका तालात आणि लयीत, त्यांच्या सांप्रदायिक गजरावर चालत पुढे सरकत आहे. त्यांच्या वेशभूषा सुद्धा एका रंगसंगती मध्येच आहेत. एका तालावर चालताना वर्दळीच्या भागात हि दिंडी ग्लोबल वॉर्मिंगवर संदेश देताना आढळून आली. अश्याप्रकारे वसुंधरा पायी दिंडीचे हे सलग तिसरे वर्ष आहे आणि तेही नवीन २ दिंडींसह, जी एक वाखाणण्याजोगी बाब आहे. यातून संस्थानाचा एक चांगला उपक्रमच नाही तर त्यांचे सातत्य आणि चिकाटीहि दिसून येते. या दिंडीमध्ये सहभागी भाविकांची सुद्धा विशेष काळजी घेतली जात आहे असे आढळून आले, कारण वेळेच्या वेळी सकस आहार पुरवला जात आहे, सोबत दिंडीमध्ये संस्थानाची एक ॲम्ब्युलन्स चालताना आढळून आली. ज्यात एक वैद्यकीय पथकहि सेवा देताना दिसून आले आहे. अशी हि आगळीवेगळी पायी दिंडी ज्यात फक्त मध्यमवयीनच नाही तर युवा–युवती, महिला–



पुरुष असे सर्व वयोगटाचे आणि सर्व सामाजिक वर्गातले भाविक दिसून आले. जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजींच्या प्रेरणेने अनेक समाजपयोगी उपक्रम राबवले जात आहेत, जसे महामार्गावरील ॲम्ब्युलन्स सेवा, मरणोत्तर देहदान, मरणोत्तर अवयव दान, गरीब मुलांसाठी मोफत उइडए बोर्डचे शिक्षण, सर्व जातीपंथांच्या मुला–मुलींसाठी मोफत वेदपाठशाळा, रक्तदान, व्यसनमुक्ती, आपत्कालीन सेवा, दुर्बल घटक पुनर्वसन या आणि अश्या अनेक उपक्रमांसाठी रामानंद संप्रदाय नेहमीच ओळखले गेला आहे. त्यांच्या या विविध समाजहितोपयोगी उपक्रमासाठी देखील समाजात विविध स्तरांवर यांचे कौतुक होत आहे. यासोबत दुग्धशर्करा योग म्हणजे हल्लीच घोषित करण्यात आलेली सरकारी योजना– 'एक पेड माँ के नामः, जी या सलग ३ वर्षे सुरू असलेल्या वसुंधरा पायी दिंडीच्या पर्यावरणसंरक्षणाच्या प्रयत्नांना जोड देते. म्हणूनच विशेष कौतुकाची बाब म्हणजे आता रामानंद संप्रदायाने सरकारच्या या योजनेत सुद्धा हिरीरीने आणि सक्रिय सहभाग घेतला आहे. या दिंडींदरम्यान शेकडोंच्या संख्येने वृक्ष लागवड करण्याचा मानस पूज्यपाद जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेतून करण्यात आला आहे. केज मध्ये या दिंडीचे दुपारच्या जेवणाचे नियोजन व स्वागत करण्यात आले.

# बाभळगाव दसरा मेळावा संपन्न; 'ओल्या दुष्काळात सरकार हात आखडता घेत आहे, शेतकऱ्यांसाठी स्वस्थ बसणार नाही' माजी मंत्री, आ.अमित देशमुख

लातूर / प्रतिनिधी :- यंदाच्या दसरा सणावर 'ओल्या दुष्काळाचे सावट' असल्याबद्दल तीव्र खंत व्यक्त करुन या महत्त्वाच्या सणाच्या दिवशी जनतेच्या चेहऱ्यावर उत्साह आणि आनंद दिसून येत नाही, असे नमूद करून या अडचणीत सापडलेल्या शेतकरी, मजूर आणि शेतीवर आधारित व्यावसायिकांना शासनाकडून योग्य मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिली. गुरुवार, २ ऑक्टोबर रोजी सायंकाळी बाभळगाव येथे दसरा मेळावा उत्साहात संपन्न झाला. पारंपरिक दसरा महोत्सवात सायंकाळी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख सहभागी झाले. यावेळी त्यांच्यासोबत खासदार डॉ. शिवाजी काळगे, विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख यांच्यासह काँग्रेस पक्षाचे आणि जिल्ह्यातील विविध संस्थांचे मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव कल्याण पाटील, समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, रेणा सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन प्रवीण पाटील, माजी चेअरमन सर्जे राव मोरे, श्री संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन सचिन पाटील, माजी चेअरमन गणपतराव बाजूळगे, लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष घोडके, गणेश एसआर देशमुख, महादेव मुळे, यशपाल कांबळे, हरिभाऊ गायकवाड, प्रा. प्रवीण कांबळे, व्यंकटेश पुरी, एडवोकेट अतिश चिकटे, प्रवीण सूर्यवंशी, शरद देशमुख, रामदास पवार, प्रताप पाटील, अनंत बारबोले, सुंदर पाटील कव्हेकर, युनूस मोमीन, विकास कांबळे आदीची उपस्थिती होती. ढोल-ताशांच्या गजरात बाभळगाव येथील दसरा मिरवणुकीला सुरुवात झाली. आमदार अमित विलासराव देशमुख यांनी महादेव मंदिर, हनुमान मंदिर, खंडोबा मंदिर, मेसाईमाय देवी मंदिर आणि दुर्गामाता देवी मंदिरात जाऊन दर्शन घेतले व आरती केली. याशिवाय, त्यांनी बाभळगाव येथील मलंग शाहवली दर्गा येथे चादर अर्पण करून सामाजिक सलोख्याचे दर्शन घडवले. यावेळी बोलतांना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, यावर्षीच्या दसरा महोत्सवावर ओल्या दुष्काळाचे सावट असल्यामुळे या महत्त्वाच्या सणाच्या दिवशी जनतेच्या चेहऱ्यावर उत्साह आणि आनंद दिसून येत नाही असे नमूद करून अडचणीत सापडलेल्या शेतकरी, मजूर आणि शेतीवर आधारित व्यावसायिकांना शासनाकडून योग्य प्रकारची मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही याप्रसंगी बोलताना दिली.

**सरकारवर तीव्र टीका: 'बुलेट ट्रेनसाठी पैसे आहेत, शेतकऱ्यांसाठी नाहीत?'**

सततची अतिवृष्टी, नदी नाल्यांना आलेला पूर यामुळे खरीप पिकांची पूर्णत: नासाडी झाली आहे, रब्बीची पेरणीही होईल की नाही अशी अवस्था आहे, रबीची पेरणी करायची ठरवली तरी खते, बियाणे विकत घेण्याची परिस्थिती आता शेतकऱ्यांकडे राहिलेली नाही, या परिस्थितीत शासन ओला दुष्काळ मान्य करायला तयार नाही, शासनातील काही प्रतिनिधी पैशाचे सोंग करता येणार नाही असे बोलत आहेत, न मागता बुलेटट्रेन आणि शक्तीपीठ महामार्ग बांधण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च करण्यास तयार असलेले केंद्र आणि राज्यातले सरकार शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रसंग आल्यानंतर मात्र हात आखडता घेताना दिसत आहे, असे सांगून अतिवृष्टीने अडचणीत आलेल्या शेतकरी आणि इतर सर्वच घटकांना शासनाकडून भरीव मदत मिळवून दिल्याशिवाय काँग्रेस पक्ष आणि आपण स्वस्थ बसणार नाही असे आश्वासनही या प्रसंगी बोलताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी दिले. आदरणीय विलासराव देशमुख साहेब आणि आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या साखर कारखान्यांनी या जिल्ह्यातील अर्थकारण बदलण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला आहे परंतु उसाचे क्षेत्र कमी असल्यामुळे या प्रयत्नांना मर्यादा येत आहेत, अशा परिस्थितीत, शेतकऱ्यांनी आधुनिकतेची कास धरायला हवी. नवे तंत्रज्ञान आणि यांत्रिकीकरणाला महत्त्व देऊन शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करायला हवेत. शेतीपूरक व्यवसाय उभारायला हवेत या कामी आपण सर्वतोपरी मदत करण्यास तयार असल्याचेही याप्रसंगी आमदार देशमुख यांनी सांगीतले.

**सामाजिक एकतेचा संदेश देणारा दसरा महोत्सव**

बाभळगावचा दसरा महोत्सव इतर ठिकाणांपेक्षा आगळावेगळा आहे. या महोत्सवात सर्व जाती-धर्माचे लोक स्वयंस्फूर्तीने सहभागी होतात, सामाजिक एकतेचा संदेश देणारा हा दसरा महोत्सव मागच्या अनेक पिढ्यांपासून साजरा होत आला आहे भविष्यात ही परंपरा कायम राहील असा विश्वासही यावेळी व्यक्त केला. अपारंपारिक ऊर्जेचा वापर, स्वच्छता या क्षेत्रात बाभळगाव ग्रामपंचायतला विविध पुरस्कार मिळाले आहेत, हे कार्य आगामी काळात याच पद्धतीने सुरू राहील अशी अपेक्षा व्यक्त करून इतर क्षेत्रातही नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून बाभळगाव ग्रामपंचायतीने इतर ग्रामपंचायती समोर अनुकरणीय आदर्श निर्माण करावेत असे आवाहन यावेळी आमदार देशमुख यांनी बोलतांना केले.



**'मतदानरुपी अस्त्राचा वापर करा! खासदार डॉ. शिवाजी काळगे**

खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी केंद्र व राज्य सरकारला 'गेंड्याच्या कातडीचे' संबोधले. ते म्हणाले, भाजपने २०१४ सालापासून शेतकऱ्यांना अधोगतीला लावले. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन त्यांनी पाळले नाही. या दसऱ्याच्या दिवशी संकल्प करून, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार अमित विलासराव देशमुख व जिल्हा बँकेचे अध्यक्ष धीरज विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली रस्त्यावर उतरून लढा उभारू, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. तसेच, जनतेने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेत मतदानरूपी अस्त्राचा वापर करून सरकारला जागा दाखवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

**'शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार मदत द्या' अभय साळुंके**

लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके यांनी महायुती सरकारने जाहीर केलेली साडेआठ हजार रुपयांची मदत तुटपुंजी असल्याचे सांगितले. ते म्हणाले, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी ई-पीक पाहणीची मुदत वाढवण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे फोनद्वारे केली असून, मुख्यमंत्र्यांनी आश्वासनही दिले आहे. त्यांनी शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्याची मागणी केली. काँग्रेसने इंग्रजांना पळवून लावले, आता केंद्र व राज्य सरकारलाही त्यांची जागा दाखवेल आणि शेतकरी-शेतमजुरांना काँग्रेसच न्याय मिळवून देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**बाभळगाव ही प्रेरणाभूमी किरण जाधव**

लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव म्हणाले की, लातूर जिल्ह्यातील बाभळगाव हे केवळ गाव नाही, तर ती एक प्रेरणाभूमी आहे. राजकारण आणि समाजकारणाचा आदर्श लोकनेते विलासराव देशमुख यांनी याच कर्मभूमीत दाखवून दिला. अतिवृष्टीमुळे शेतकरी अडचणीत असताना, महायुती सरकार तुटपुंजी मदत जाहीर करून लबाडी करत आहे. त्यामुळे जनतेने त्यांना येत्या स्थानिक स्वराज्य संस्थेत जागा दाखवावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमानंतर आमदार अमित विलासराव देशमुख व मान्यवरांनी विजयादशमीनिमित्त विलास बागेत जाऊन लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतींना पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जहांगीर पठाण यांनी केले, तर आभार अविनाश देशमुख यांनी मानले. यावेळी बाभळगावच्या सरपंच सचिन प्रिया मस्के, उपसरपंच गोविंद देशमुख, बाभळगाव विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन महादेव जटाळ, श्याम देशमुख, अनवर देशमुख, अविनाश देशमुख, सचिन मस्के, राहुल डुमणे, राम स्वामी, शिवाजी कांबळे, महादेव देशमुख, शिवाजी जाधव, गोपाळ तापडे, मोहन सुरवसे तबरेज तांबोळी, नानासाहेब जाधव, बादल शेख, विष्णुदास धायगुडे, अब्दुल्ला शेख, जीवनराव देशमुख, माणिक सगर, गोपाळ थडकर, इंद्रजित पाटील, वसंत मस्के, मेहबूब शेख, बाबासाहेब देशमुख, महेश जाधव, बंदेनवाज सय्यद, आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते, बाभळगाव ग्रामपंचायत, बाभळगाव विविध कार्यकारी सोसायटीचे सर्व सदस्य पदाधिकारी,बाभळगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित

# व्ही पँथर्स च्या आंदोलनाचा दणका नांदेड विद्यापीठाने युवक महोत्सवाची तारीख बदलली

लातूर :- व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या नेतृत्वाखाली स्वामी रामानंद विद्यापीठ नांदेड चे व्यवस्थापन समिती सदस्य तथा शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे यांना निवेदन देऊन मराठवाड्यामध्ये ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे नियोजित युवक महोत्सवाची तारीख बदलावी अशी मागणी करण्यात आली होती त्याला अनुसरून विद्यापीठाने युवक महोत्सवाची तारीख बदलली आहे. या निवेदनावर संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे संपर्कप्रमुख आनंद जाधव विद्यार्थी आघाडी जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश ढगे प्रणव मालू आदींच्या स्वाक्षऱ्या होत्या. विद्यापीठाने तारीख बदलल्याबद्दल विनोद भाऊ खटके यांनी विद्यापीठातील सांस्कृतिक विभागाचे आभार मानले आहेत .



# दहावी बारावी बोर्ड परीक्षेचे परीक्षा शुल्क माफ करण्याची व्ही एस पँथर्सची मागणी

लातूर :- व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर विभागीय शिक्षण मंडळ येथे विद्यार्थी आघाडीच्या शिष्टमंडळाने अधिकाऱ्याची भेट घेऊन निवेदनाद्वारे दहावी बारावी बोर्ड परीक्षेचे शुल्क माफ करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली . लातूर विभागात अतिवृष्टीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे आणि शेतीवर आधारित उद्योग ही अडचणीत आले आहेत, पावसामुळे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे याचा गंभीरपणे विचार करून लातूर विभागीय शिक्षण मंडळाने दहावी बारावी बोर्ड परीक्षेचे शुल्क माफ करावे अन्यथा व्ही एस पँथर्स तीव्र आंदोलन करेल असा इशारा यावेळी देण्यात आला . या निवेदनावर विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे ,जिल्हाउपाध्यक्ष ऋषिकेश ढगे सिध्दांत कांबळे, स्वप्नील बनसोडे, अजहर शेख सुमित कांबळे आदींच्या स्वाक्षरी आहेत .




# पूरग्रस्तांसाठी शिवाई प्रतिष्ठानची बांधिलकी किराणा किटसह ब्लँकेटसचे वाटप

लातूर /प्रतिनिधी :- जिल्ह्यात अतिवृष्टी व महापुराने मोठे नुकसान झाले असून अनेक नागरीकांच्या घरां-संसारास त्याचा मोठा फटका बसला आहे. आपत्तीने भरडलेल्या अशा परिवारांसाठी लातूर येथील शिवाई प्रतिष्ठान सरसावले असून प्रतिष्ठानच्या वतीने गरजूंना देण्यासाठी शंभर किराणा किट व शंभर ब्लँकेटस बुधवारी (दि.१) सुपूर्द करण्यात आल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा उषा भोसले होत्या. डॉ. जयश्री धुमाळ, संगिता देशमुख, सई गोरे, डॉ. माधुरी कदम, डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. अभय कदम, हंसराज जाधव, विशाल जाधव, डी.एस. पाटील, धनंजय शेळके आदिंची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उषा भोसले यांनी शिवाई प्रतिष्ठान सदैवच सेवाकार्यात पुढे असते शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आदीत कार्य सुरू असल्याचे सांगितले. डॉ. हर्षवर्धन राऊत यांनी आपत्तीने बाधीत झालेल्या कुटूंबाना आधार देणे ही आजच्या क्षणाची गरज असून याच जानीवेतून शिवाईने केलेली ही मदत गरजुंच्या दारापर्यंत जाऊन दिली जाईल असा विश्वास दिला. डॉ. अभय कदम यांनी शिवाईचे हे सेवाकार्य इतरांना प्रेरणा देईल असे सांगितले. डी.एस. पाटील यांनी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी करण्यात आलेल्या नियोजनाबद्दल विस्ताराने माहिती दिली. प्रास्ताविक डॉ. माधुरी कदम यांनी केले. सुत्रसंचालन सुरेखा गरड यांनी केले. आभार प्रतिष्ठानच्या सचिव डॉ. जयश्री धुमाळ यांनी मानले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येत शिवाईंची उपस्थिती होती.




# मस्साजोग येथे महिलेचा विनयभंग करून दिली जिवे मारण्याची धमकी.




केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील मस्साजोग, ता. केज. जि. बीड येथे ६५,वर्षीय महिलेचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना दि, ३०/९/२०२५ मंगळवार,रोजी घडली असून अरोपी विरोधात केज पोलिस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तालुक्यातील मस्साजोग ता. केज. जि. बीड.येथील एका ६५, वर्षीय महिलेचा वाईट हेतूने हाताला धरून ओढत घरात चल म्हणून विनयभंग करण्यात आला सदरील महिला आपल्या राहत्या घरासमोरील मोकळ्या जागेतील गवत काढत असताना आरोपी अनंत मंचकराव देशमुख तेथे आला व माझ्या हाताला धरून वाईट हेतूने घरात चल म्हणून मला ओढू लागला त्यावेळी मी आरडा ओरड केली असता माझे पती तेथे धावत आले त्यावेळी मला व माझे पतीला तुझ्याकडे बघतो म्हणून.. जीवे मारण्याची धमकी देवून पळून गेला. याप्रकरणी केज पोलिस स्टेशनला अरोपी विरोधात महिलेच्या फिर्यादी वरून इपी, २०२५,७४,इपी, २०२५,,३५२,इपी, २०२५,३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून केज पोलिस स्टेशनचे प्रभारी पी. आय. उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब सानप हे पुढील तपास करत आहेत.

# केज तालुक्यातील साबला येथे ग्रामस्वच्छता अभियान संपन्न

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील साबला येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त. तसेच दसरा,विजयादशमी निमित्त ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले.

गावातील वातावरण स्वच्छ रहावे, गावात रोगराई पसरु नये, गावातील सर्व जनतेचे आरोग्य चांगले रहावे,कोणीही आजारी पडू नये, मी माझ्या गावाचा माझे गाव स्वच्छ गाव, सुंदर गाव हा संकल्प करून. साबला नगरीत नेहमीच स्वच्छ ते बाबत माहिती दिली जाते . तसेच साबला नगरीतील नागरिक ही याबद्दल जागरुक आहेत.

या ग्रामस्वच्छता अभियानात समाजसेवक नरहरी काकडे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,चेरमन उत्तमराव काकडे, गणेश कटारे,काशिनाथ नाईकनवरे,लखन राऊत, हनुमंत परळकर,राहुल मुळे,नजीर काझी,महादेव परळकर,अक्षय काकडे,रामहरी काकडे,धनंजय नाईकनवरे,कल्याण भोसले, विश्वनाथ नाईकनवरे यांच्यासह साबला नगरीतील नागरिकांनी या ग्रामस्वच्छता अभियानात सहभाग घेऊन साबला नगरीत ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले.



# केज येथे धनगर समाज बांधवांचे रस्ता रोको आंदोलन

केज/प्रतिनिधी - जालना येथे गेल्या पंधरा दिवसापासून दीपक भिमराव बोराडे हे आमरण उपोषणास बसलेले आहेत परंतु शासनाने अद्यापही बोराडे यांच्या उपोषणाची दखल घेतली नाही म्हणून केज येथे धनगर समाज बांधवासह मेंढ्या घेऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, धनगर समाज बांधवांना एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी जालना येथे दीपक भिमराव बोराडे हे मागील पंधरा दिवसापासून आमरण उपोषण करत आहेत परंतु त्यांच्या मागणीची प्रशासनस्तरावर अद्यापही दखल घेण्यात आलेली नाही म्हणून दिनांक १ ऑक्टोंबर २०२५ रोजी केज शहरासह तालुक्यातील धनगर समाज बांधवांनी एकत्र येत शहरातील अहिल्यादेवी नगर येथून मेंढ्यासह ढोल ताशाच्या गजरात भव्य मोर्चा रॅली काढून श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रस्ता रोको आंदोलन करून दीपक भीमराव बोराडे यांच्या आमरण उपोषणास पाठिंबा दर्शविला आहे. धनगर समाज बांधवांनी वेळोवेळी आंदोलन करून धनगर समाज बांधवांना एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे ही प्रमुख मागणी गेल्या अनेक वर्षांपासून लावून धरली असताना वेळोवेळी लेखी व तोंडी आश्वासन देण्यात आली परंतु प्रत्यक्षात आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.सन १९५६ पासून धनगर समाज धनगड ऐवजी धनगर जमाती म्हणून घोषित करण्यासाठी आंदोलन करत आहे महाराष्ट्र सरकारने अभ्यास केला आहे आणि असे आढळून आले आहे की,महाराष्ट्र राज्यात धनगड जमात ही अस्तित्वात नाही आणि धनगर ही महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात असलेली जमात आहे. महाराष्ट्र राज्यांनी या वस्तुस्थितीला सहमती दर्शविली आहे आणि डब्ल्यूपी क्रमांक४९१९/२१७ मध्ये मुंबई उच्च न्यायालयातील प्रतिज्ञापत्रे सादर केली आहेत, ज्यामध्ये महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच याचीकाकर्ते म्हणून होते आणि महाराष्ट्र राज्य सरकार प्रतिवादी होते यासह विविध मागण्याचे निवेदन केज तहसीलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी स्वीकारले. या लेखी निवेदनावर बाळासाहेब गाढवे, अजय रोडे, बालाजी जाडकर, विलास करडे, संजय गाढवे, काशिनाथ रोडे, भारत शिंपले, वैजिनाथ गाढवे, पिंटू रोडे, सिद्धार्थ गाढवे यांच्यासह धनगर समाज बांधवांच्या स्वाक्षऱ्या आहेत.




PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE